# Media Coverage of SRTTC-FoE, Khamshet, Pune

पुढारी

## संक्षिप्त



**कार्यशाळेत सहभागी झालेले मान्यवर.**

## तुलसियानी अभियांत्रिकीमध्ये कार्यशाळा

कामशेत : येथील सुमन रमेश तुलसियानी टेक्निकल कॅम्पस अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नुकतेच इंटरनेट ऑफ थिंग्ज या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे सल्लागार ज्ञानेश्वर कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये राज्यातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील अधिव्याख्याते व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उपस्थितांना योगेश पिंगळे, ट्रेंट्रॉनचे संचालक पराग हरोळीकर, स्प्रिंग कंप्यूटिंग टेक्नॉलॉजीच्या शीतल देशपांडे आणि इन्फोससिचे मुख्य सल्लागार डॉ. दत्तात्रय पार्ले आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन अश्विनी नांगरे यांनी केले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. फाकटकर, उपप्राचार्य के. एस. तापसकर व निमंत्रक प्रा. सोनाली पाटील यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोगाने अनुदान दिले होते.

My Pimpri
Page No. 05 Jan 17, 2018
Powered by: erelego.com

# Media Coverage of SRTTC-FoE, Khamshet, Pune

पुढारी

# रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**कामशेत** : येथील सुमन रमेश तुलसियानी टेक्निकल कॅम्पस इंजिनिअरिंग कॉलेज कामशेत व जनकल्याण रक्तपेढी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेजमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनीसह शिक्षक वर्गाने उत्स्फूर्त सहभाग घेतला. सुमारे ९० जणांनी रक्तदान व रक्त संकलित करण्यास सहयोग दिला. याप्रसंगी जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. आशुतोष काळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे आभार मानले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिभाऊ फाकटकर, उपप्राचार्य प्रा. किशोर तापसकर, तसेच प्रा. हरिप्रसाद माल व सर्व शिक्षक उपस्थित होते.



शिबिरातील उपस्थित रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

My Pimpri
Page No. 05 Oct 04, 2017
Powered by: erelego.com

# Media Coverage of SRTTC-FoE, Khamshet, Pune

पुढारी

# ‘तुलसियानी कॅम्पस’मध्ये कौशल्य विकास कार्यक्रम

**कामशेत** : येथील सुमन रमेश तुलसियानी टेक्निकल कॅम्पस ( व्ही आयटी ) व श्री शारदा विद्या प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत टर्निंग कोर्सचे उद्घाटन नंदकिशोर देवधर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी देवधर यांनी या अभ्यासक्रमासाठी आवश्यक पात्रता व रोजगार संधी याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर श्रीकृष्ण देव यांनी मावळ परिसरातील उद्योगांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाच्या दृष्टीने या अभ्यासक्रमाचे महत्व सांगितले. विद्या प्रबोधिनीचे दत्तात्रय न्यायाधीश यांनी या अभ्यासक्रमाची तांत्रिक माहिती दिली. सुमन रमेश तुलसियानी टेक्निकल कॅम्पसचे सेक्रेटरी श्रीपाद कुवेलकर यांनी हा कोर्स ना नफा ना तोटा या तत्त्वावर सामाजिक बांधिलकी म्हणून चालविण्यात येणार असल्याचे सांगून स्थानिक परिसरातील सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन केले.

My Pimpri
Page No. 05 Aug 12, 2017
Powered by: erelego.com